# नियमित दिवाणी दावा क. ७९/२००६ मधील निशाणी ८१ वरील आदेश

( अनिता भोंगळे वि. नामदेव गरुड )

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे :—

वादीने वाटप, ठराव व निरंतर ताकिदीसाठी दिलेला दावा प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ व ३ यांना गट नं. ३१५१ मधील आठ आणे हिस्सा दिनांक ११/०३/२००२ रोजी विक्री केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दिनांक १२/०२/२०१५ रोजी साठेखत व त्याआधारे दिनांक १७/११/२०१५ रोजी सदर जमीनीचे खरेदीखत विनायक चांगदेव गरुड, श्रीधर चांगदेव गरुड, सरस्वती ज्ञानेश्वर गरुड व रमाकांत लक्ष्मण वाघोले यांना करुन दिलेले आहे. सदर इसम दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. वादी सदर साठेखत व खरेदीखताबाबत ठरावाची मागणी व वरील इसमांना दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्याची मागणी करत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यांनी शेवटी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी निशाणी ८३ वर म्हणणे देवून सदर अर्जास हरकत घेतलेली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज खरा व कायदेशीर नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती मुदतबाहय आहे. वादी दिनांक ११/०३/२००२ रोजीचे खरेदीखताबाबत ठराव मागत आहेत. ती मागणी मुदतीत नाही. सदर खरेदीखतावरुन प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी दिनांक १७/११/२०१५ रोजी त्या मिळकतीचे खरेदीखत ति—हाईत इसमांना करुन दिलेले आहे. वादीने सदर खरेदीदारांची पूर्ण नाव व पत्ते अर्जात दिलेले नाहीत. अर्ज मोघम व अर्धवट

स्वरुपाचा आहे. त्याने शेवटी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय बाजूंचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वाटप, ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. वादीने दिनांक ११/०३/२००२ रोजीचे खरेदीखत तिचे हिश्श्यावर बंधनकारक नाही अशा ठरावाची मागणी दाव्यात केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी दाव्यास कैफियत दिलेली आहे. निशाणी २१ वर वाद मुद्दे निश्चित केलेले आहेत. सदर दाव्याच्या सुनावणीस सुरुवात झाली आहे.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश—६ नियम १७ प्रमाणे कोणताही पक्षकार दाव्याच्या कोणत्याही स्थितीत आपल्या कथनामध्ये दुरुस्ती करु शकतो. परंतु सदर तरतूदीच्या परंतुकामध्ये एखाद्या पक्षकाराने सावधानता बाळगूनही जर त्यास सुनावणी सुरु होण्यापूर्वी दुरुस्ती अर्ज देणे शक्य झाले नसल्यास तो पक्षकार सुनावणीस सुरुवात झाल्यानंतरही दुरुस्ती अर्ज देवू शकतो असे नमुद केलेले आहे.

६. वादीने दिनांक १२/०२/२०१५ रोजीचे साठेखत व दिनांक १७/११/२०१५ रोजीचे खरेदीखताची प्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी गट नं. ३१५१ चे प्रथम साठेखत व त्यावरुन खरेदीखत करुन दिल्याचे दिसून येते. सदर दोन्ही व्यवहार दावा प्रलंबित असताना झालेले असून वादी सदर दस्तास पक्षकार नाहीत. वादी सदर दुरुस्ती दावा प्रलंबित असताना घडलेल्या बाबी अभिलेखावर आणण्यासाठी करत आहे. त्यामध्ये वादीने काही निष्काळजीपणा किंवा उशीर केला असे म्हणता येणार नाही. वादी मागत असलेली दुरुस्ती प्रकरणातील सर्व वाद विषय एकाचवेळी परिणामकारकपणे निकाली काढण्यास उपयुक्त ठरणार आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही.

७. दावा प्रलंबित असताना झालेल्या साठेखत व खरेदीखताच्या दस्तावरुन ति—हाईत इसमांचे दावा मिळकतीमध्ये काही हितसंबंध निर्माण झालेले आहेत. त्यांची हजेरी सदर प्रकरणातील सर्व वाद एकाचवेळी परिणामकारकपणे निकाली काढण्यास उपयोगाची ठरणार आहे. त्यामुळे सदर दुरुस्ती अर्ज मंजुर करणे योग्य होणार आहे. वरील सर्व विवेचनावरुन न्यायाच्यादृष्टीने मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज निशाणी ८१ मंजुर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याच्या प्रती सादर कराव्यात.

दिनांक : २८/११/२०१७ (वैभव क. जाधव)
ठिकाण : सासवड दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सासवड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File order are same word for word as per original order.

Name of clerk - G. S. Chougule
Court Name - V.K. Jadhav, CJJD, Saswad.
Date - 28/11/2017
Order signed by
P.O. on - 28/11/2017
Order uploaded on - 29/11/2017